पोलीस आयुक्त, ठाणे यांचे कार्यालय

खारकर आळी, कळवा ब्रिज जवळ, ठाणे, ४००६०१, दूरध्वनी क्रमांक - ०२२ - २५४४३६३६
Email - cp.thane.confibr@mahapolice.gov.in

जा.क्र.ठाआ/गोशा/पोलीस निरीक्षक/नेमणूक/ ७७५८ /२०२६, दि. 30 /०६/२०२६

संदर्भ :- १) महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१.
२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडील DGP - D20140/19/2024-DESK 2, दि. ०१/०५/२०२५
३) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. टीआरएन - ०११०/प्र.क्र. ४८८/पोल ५ ब, दि. २३/०४/२०१०
४) आयुक्तालय स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ यांच्या दि. ३०/०६/२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

विषय :- पोलीस निरीक्षक बदली पदस्थापनेबाबत.

----०००----

आदेश :-

ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील खालील नमूद पोलीस निरीक्षक यांनी सहायक पोलीस आयुक्त पदावर पदोन्नती नाकारली असल्याने त्यांच्याविरुध्द संदर्भ क्र. ०३ च्या शासन निर्णयानूसार कार्यवाही करण्याबाबत संदर्भ क्र. ०२ अन्वये कळविण्यात आले आहे.

महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम २२ न (२) मधील सुधारित स्पष्टीकरणानुसार आयुक्तालय स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ यांना सक्षम प्राधिकारी म्हणून प्रदान असलेल्या अधिकारान्वये, ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील खालील नमूद पोलीस निरीक्षक यांची अपवादात्मक प्रकरणांमध्ये प्रशासनिक निकडीनुसार ठाणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

अ.क्र.	पोलीस निरीक्षक यांचे नाव	सध्याचे पदस्थापना ठिकाण	बदली पदस्थापना ठिकाण
१	कृष्णदेव कल्पना खराडे	भिवंडी शहर पो.स्टे.	शहर वाहतूक शाखा

२. संबंधित सहायक पोलीस आयुक्त यांनी या आदेशाची प्रत उक्त नमूद पोलीस अधिकारी यांना बजावून त्यांना तात्काळ बदली पदस्थापने ठिकाणी कार्यमुक्त करावे व अनुपालन अहवाल या कार्यालयात सादर करावा. बदली झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करताना पर्यायी/ बदलीवर येणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांची वाट पाहू नये.

३. संबंधित सहायक पोलीस आयुक्त यांनी उक्त नमूद पोलीस अधिकारी यांचा अतिरीक्त कार्यभार तसेच त्यांच्याकडील प्रलंबित असलेली प्रकरणे व तपासावरील प्रलंबित असलेले गुन्हे जमा करुन घेवुन पोलीस ठाणे/ शाखेत सेवेने ज्येष्ठ असलेल्या पोलीस अधिकारी यांच्याकडे देण्याबाबत कार्यवाही करावी.

४. बदली झालेल्या संबंधित पोलीस निरीक्षक यांनी त्यांच्या बदली पदस्थापने ठिकाणी तात्काळ हजर व्हावे. संबंधित सहायक पोलीस आयुक्त यांनी नमूद पोलीस अधिकारी हजर झाल्याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयात तात्काळ सादर करावा.

पोलीस आस्थापना
मंडळाच्या मान्यतेने

(मिना मकवाणा)
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय १,
पोलीस आयुक्तालय, ठाणे

प्रति,

संबंधित सहायक पोलीस आयुक्त, ठाणे